संशोधन शीर्षक:

संत एकनाथांच्या वाङ्मयातून व्यक्त होणाऱ्या वैश्विक मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना

जगातील अनेक विचारवंतांनी अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडलेल्या वैश्विक मानवी मूल्यांचे विविध प्रकार आहेत. सद्वर्तन, प्रेम, सत्य, अहिंसा, शांती, परोपकार, स्वयंशिस्त, व्यापक दृष्टिकोन, यशस्वीता, आनंदप्राती, शहाणपण, ऐक्य, स्वातंन्त्र्य, समता, सामंज्यस्य इ. असे अनेक प्रकार आहेत.

संतश्रेष्ठ एकनाथांनी आपल्या विपुल आणि विविध प्रकारच्या वाङ्मय निर्मितीमुळे, सोळाव्या शतकात, मायबोली मराठी भाषेला वैभवाचे दिवस प्राप्त करून दिले. खरा मानवधर्म कोणता हे स्पष्ट करीत त्यापासून दूर जाणाऱ्या समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य संत एकनाथांनी अत्यंत रंजक पध्दतीने आपल्या काव्यात्मक ग्रंथसंपदेतून, अभंग, गौळणी व भारूडातून लोकभाषेचा आणि लोकरीती रिवाजांचाआधार घेऊन प्रभावीपणे केलेले दिसते. सोळाव्या शतकातील त्यांच्या या रचना आज एकविसाव्या शतकातही वैशिष्टयपूर्ण सामाजिक बदलासाठी तितक्याच प्रभावीपणे उपयुक्त ठरू शकतात. ही त्यातील विचारांची कालातीतता, वैश्विक मानवी मूल्यांशी जोडता येऊ शकते. कारण वैश्विक मानवी मूल्येही मूलत: कालातीत असतात. या दृष्टिकोनातून सदर संशोधनात संत एकनाथांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

संशोधन निवडीची भूमिका:

कोणतेही संशोधन करण्यापूर्वी त्या संबंधित उपलब्ध असलेल्या विभिन्न प्रकारच्या साहित्याचा आढावा घेणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन करताना एकनाथांचे समग्र वाङ्मय, त्यावर झालेली विविध संशोधने, समीक्षात्मक ग्रंथ, लेख इ. चा आढावा घेतल्यानंतर लक्षात आले की, त्यांच्या एकूणच साहित्यात तत्कालिन

सामाजिक, राजकीय, आर्थिक व्यवस्थेचे प्रतिबिंब पडलेले आहे. त्या संदर्भात अनेक संशोधक अभ्यासकांनी सविस्तर विवेचनही केलेले आहे. परंतु एकनाथांच्या वाङमयाचे सूक्ष्म निरीक्षण केले असता त्यात एक 'मानवी मूल्यव्यवस्था' दडलेली दिसते. त्या संदर्भात सखोल चिंतन होणे गरजेचे आहे, असे वाटले. एकनाथांच्या समग्र रचनेत दडलेल्या या मूल्यव्यवस्थेचा अभ्यास वैश्विक मानवी मूल्यांसंदर्भात केला तर त्यातील विचारांची मूळात असलेली व्यापकता संशोधन अभ्यासाच्या निमित्ताने अधिक स्पष्ट करता येईल असे वाटले. त्याकरिता भारतीय व पाश्चात्य विचारवंत, अभ्यासकांनी स्वतंत्रपणे वैश्विक मानवी मूल्यांसंदर्भात मांडलेले विचार जाणून घेणे व त्याचा सहसंबंध एकनाथांच्या साहित्याशी जोडणे ही या संशोधन विषयनिवडीची प्रमुख भूमिका आहे.

संशोधन विषयाचे महत्त्वः—

आधुनिक काळात वैश्विक मानवी मूल्यांसंदर्भात जगभरातील संशोधक, अभ्यासक व विचारवंतांनी सविस्तर विचार केलेला दिसतो. शतकांपूर्वी संत एकनाथ यांनी त्यांच्या साहित्यातून सहज प्रकट केलेली मानवी मूल्ये व आधुनिक काळात मांडला गेलेला वैश्विक मानवी मूल्यविचार यांचा तुलनात्मक आणि एकात्मिक अभ्यास, एकनाथांचे साहित्य मूळतः कसे वैश्विक आहे व कालातीत आहे स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त ठरेल. कोणत्याही काळात जीवन जगत असताना माणसाला या मानवी मूल्यव्यवस्थेचे महत्त्व असणारच आहे. या निमित्ताने आजच्या आधुनिक काळातही प्राचीन संतसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व व श्रेष्ठत्त्व मांडण्याचा प्रयत्न करणे शक्य होईल.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. एकनाथांच्या स्फुटलेखन, म्हणून गणल्या गेलेल्या अभंग, भारूड व गौळण, या काव्यप्रकारातील वैश्विक मानवी मूल्यांचा शोध घेणे.
२. एकनाथांच्या समग्र वाङमयातून व्यक्त होणाऱ्या वैश्विक मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास करणे

व्याप्ती व मर्यादाः

व्याप्ती: या संशोधनाची व्याप्ती समग्र संत वाङमय व सर्व वैश्विक मानवी मूल्यांपर्यंत नेता येईल.

मर्यादाः सदर संशोधन एकनाथांचे स्फुटलेखन, म्हणून गणल्या गेलेल्या अभंग, भारूड व गौळण, या काव्यप्रकारातील मानवी मूल्यांच्या चिकित्सक अभ्यासापुरते मर्यादित राहील.

मराठी साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषा संचानालय, राज्य मराठी विकास संस्थाया शासनाच्या वतीने प्रकाशनाचे काम करणाऱ्या संस्था तसेच एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद यांचेव्दारे प्रकाशित संत एकनाथांची मूळ ग्रंथसंपदा प्रमाण मानण्यात येईल.

संशोधनपध्दती:

साहित्य संशोधनाच्या विविध पध्दती आहेत. जसे, १.ऐतिहासिक किंवा कालक्रमनिष्ठपध्दती, २. तौलनिक पध्दती, ३. सूक्ष्म संहिताचिकित्सा पध्दती(भाषावैज्ञानिक,शैलीवैज्ञानिक), ४. नमुनापाहणी पध्दती ५. क्षेत्रीय सर्वेक्षण पध्दती ६. अनुभवाधिष्ठित पध्दती ७. वैज्ञानिक पध्दती, ८.समीक्षातत्त्वप्रधान संशोधनपध्दती

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने‘वर्णनात्मकसंशोधनपध्दती’चा वापर केला जाईल.

सदरसंशोधनात प्राचीन पद्य वाङमयाच्या आशयाचा मानवी मूल्यांच्या दृष्टिकोनातून तुलनात्मक अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास ऐतिहासिक व तौलनिक अशा दोन्ही पध्दतीने करता येईल.

संशोधनसाधने:

प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन करताना संशोधनासाठी उपयुक्त साधने विविध प्रकारची असतात. कोरीव लेख, हस्तलिखिते, दैनंदिनी, पत्रे, अभिलेखागारे, ग्रंथालये, कोशवाङ्मय, सूचिवाङ्मय, सांख्यिकी, प्रश्नावली, मुलाखती, संगणक व आंतरजाल वगैरे विविध साधने संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. प्रस्तुत संशोधनात आवश्यकतेनुसार योग्य त्या संशोधन साधनांचा उपयोग केला जाईल.

प्रकरण योजना

प्रकरण १ संत एकनाथ यांचे जीवन व कार्य

श्री एकनाथ (१५३२–१५९९) यांसारखे भागवतधर्माचा तळागाळापर्यंत प्रचार आणि प्रसार करणारे साधुपुरूष उदयाला आले. एकनाथांनी या सोळाव्या शतकात महाराष्ट्रात सांस्कृतिक पुनरूत्थान घडविले. मरगळलेल्या महाराष्ट्राला नवचैतन्य प्राप्त करून दिले. श्रीएकनाथ हे युगप्रवर्तक विचारवंत होते.'संत एकनाथांच्या व्यक्तीमत्वाने आणि साहित्याने नव्या सामाजिक जाणिवांचे प्रतिनिधित्व नव्हे तर नेतृत्वही केलेले आहे. भागवत धर्माचे पुनरूज्जीवन केल्यानंतर नाथांनी अनेक साहित्यप्रकारांच्या साहाय्याने सामाजिक जिद्द आणि धर्म संस्कृती–संरक्षणाचा ध्येयवाद समाजाच्या सर्व थरापर्यंत पोचविला' या शब्दांत श्री. रं. कुलकर्णी यांनी श्रीएकनाथांच्या कामगिरीचे महत्व विशद केले.

या दृष्टीने सदर प्रकरणात सविस्तर विवेचन केले जाईल.

प्रकरण २ वैश्विक मानवी मूल्यांचे स्वरूप

सद्‌वर्तन, प्रेम, सत्य, अहिंसा, शांती, परोपकार, स्वयंशिस्त, व्यापक दृष्टिकोन, यशस्वीता, आनंदप्राती, शहाणपण, ऐक्य, स्वातंत्र्य, समता, सामंज्यस्य इ. असे अनेक प्रकार आहेत. वेगवेगळया विचारवंतांनी मांडलेल्या वैश्विक मानवी मूल्यांचे स्वरूप या प्रकरणात स्पष्ट केले जाईल.

प्रकरण ३ संत एकनाथ यांच्या वाङमयातील वैश्विक मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास

१. **व्यापक दृष्टिकोन:** अध्यात्माच्या वैश्विक धाग्याने त्यांचे लोकसाहित्यही संपूर्णपणे बांधलेले दिसते. वरवर पाहता लोकजीवनातील उदाहरणे दिसतात. त्याच्या अर्थाची पाळेमुळे ही सखोल आणि व्यापक तत्त्वचिंतनात बांधलेली दिसतात.

२. **शहाणपण:** जीवन जगताना टोकाचा संघर्ष टाळण्यासाठी लागणारे शहाणपण एकनाथांचे लोकाभिमुख साहित्य देते.

३. **सामाजिक न्याय:** एकनाथांच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत केवळ मानवच दिसत नाही, तर समग्र जीवसृष्टी सामावलेली दिसते.

४. **समानता:** एकीकडे वेदप्रमाण्य मानणारे एकनाथ त्यातील स्त्रीशूद्रादिकांवर लादलेली बंधने मात्र पूर्णपणे झुगारून देताना दिसतात. समानतेचे सूत्र प्रसुत करतात.

५. **ऐक्य:** बाहयशत्रूशी निकराने लढा देऊन जय मिळवायचा असेल सामाजिक ऐक्याला महत्त्व आहे. एका समान लोकहिताच्या विचारांनी समाज संघटित झाला पाहिजे, हे त्यांच्या परचक्र आक्रमण विरोधी रचनांमधून व्यक्त झाले आहे.

६. **सद्‍भावना:** एकमेकांप्रती वा सर्वांप्रती असलेली आंतरिक ऐक्याची भावना अर्थात, सद्‍भावना एकनाथ महत्त्वपूर्ण मानतात.

७. **मानवता:** एकनाथांचा मानवतावादी दृष्टीकोन त्यांच्या साहित्यातून तर दिसतोच, पण प्रत्यक्ष त्यांच्या जीवनचरीत्रातही त्याचा अनुभव येतो.

८. **वैज्ञानिक दृष्टिकोन:** भारूडाच्या माध्यमातून आंधळया मूर्तिपूजेला केलेला ठाम विरोध, अनिष्ट रूढी परंपरांवर एकनाथांनी ओढललेले ताशेरे त्यांचा वैज्ञनिक दृष्टिकोन स्पष्ट करतात.

९. **व्यापक आनंद:** एकनाथांच्या गौळणी या निर्भेळ आनंदाची प्रतीती देतात.

१०. **अहिंसा:** देवाच्या निष्पाप प्राण्यांचे बळी देण्याच्या प्रथेला विरोध करीत एकनाथ आपल्या भारूडांतून समाजप्रबोधनात्मक भाष्य करताना दिसतात.

अशा प्रकारे इतर विविध मूल्यांच्या दृष्टिकोनातून सोदाहरण चिकित्सक अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण ४ संत एकनाथ यांच्या वाङमयातील समाजदर्शन

श्री एकनाथांच्या मुसलमानी सत्ता भारतभर पसरत गेली. १५२७ मध्ये अहामनी राजवट कोसळली आणि १५६५ मध्ये विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाले. याच काळात महाराष्ट्राला दुष्काळाचा तडाखा बसला. तो दुष्काळ सतत बारा वर्षे सुरू होता. परकीय राजवटींमधील सत्तासंघर्ष, आर्थिक दुरावस्था आणि धार्मिक असुरक्षितता यांनी सामान्य जनता त्रस्त झालेली होती. ‘बहुजनसमाजाची बोली मराठी, विद्वानांची भाषा संस्कृत व राजभाषा फारसी असा तीन भाषांच्या कचाटयात महाराष्ट्र समाज त्या वेळी सापडला

होता’ असे ल. रा. पांगारकर यांनी म्हटलेले आहे. अशा काळात श्रीएकनाथांनी केलेले कार्य अतिशय महत्वाचे होते.

या प्रकरणात तत्कालिन समाजजीवनाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ५ समारोप

एकनाथांचे अभंग, गौळण आणि भारूड यांच्या परिशीलनातून वैश्विक मानवी मूल्ये व त्याअनुषंगिक वरील घटक हे कालातीत असून कोणत्याही काळात कोणत्याही समुदायातील मानवजातीला उपयुक्त ठरणारे आहेत हे लक्षात येते.

यासंदर्भात सविस्तर विचार सदर प्रकरणात केला जाईल.

परिशिष्टे

१. संत एकनाथांचे छायाचित्र

२. संत एकनाथ साहित्यसूची

३. स्कॉट्झ ने मांडलेल्या वैश्विक मानवी मूल्यांची यादी

४. ‘एकनाथ संशोधनमंदिर’, खडकेश्वर, औरंगाबाद छायाचित्र

५. संत एकनाथांचे कार्यक्षेत्र, पैठण छायाचित्र

संदर्भग्रंथसूची:

अ. भारतीय ग्रंथ:

१. संपा. चंदगडकररा.कृ. (१९८३),*एकनाथीभागवत,*ढवळे प्रकाशनगिरगाव, मुंबई.

२. संपा. पणशीकर न. वि.(१९६८),*श्रीसंत एकनाथकृतआठग्रंथ,* यशवंतप्रकाशन, पुणे.

३. बडवेना. वि., (१९६८),*श्री. एकनाथमहाराजांचीभारूडे,भाग १ला,*श्री एकनाथसंशोधनमंदिर, खडकेश्वर, औरंगाबाद

४. बडवेना. वि., (१९७८), *श्री. एकनाथमहाराजांचीभारूडे, भाग २रा,*श्री एकनाथसंशोधनमंदिर, खडकेश्वर, औरंगाबाद

५. फाटक न.र.,(१९५०), *श्री. एकनाथ वाङमय आणिकार्य, मौजप्रकाशन, मुंबई.*

६. घाटे ब. गि., (१९५२), *श्री. एकनाथदर्शन, खंड १ला,* श्री एकनाथसंशोधनमंदिर, खडकेश्वर, औरंगाबाद

७. घाटे ब. गि., (१९६१), *श्री. एकनाथदर्शन, खंड २रा,* श्री एकनाथसंशोधनमंदिर, खडकेश्वर, औरंगाबाद

८. संपा. पांगारकर ल. रा.ए..(१९२२),*श्री. एकनाथचरित्र,*गणेशमहादेवआणि कं, गिरगाव, मुंबई.

९. शेणोलीकर ह. श्री., (१९७१), *प्राचीन वाङमयाचे स्वरूप,*मोघेप्रकाशन, कोल्हापूर.

१०.	तुळपुळे शं. गो.,(१९८४), *पाचसंतकवी*,सुविचारप्रकाशनमंडळ, पुणे.

११.	कुलकर्णीश्री. रं., (१९९५), *मध्ययुगीनमराठीसाहित्य: एक पुनर्विचार*,राजहंसप्रकाशन, पुणे.

१२.	संपा. डहाके व. आ.,(२०११), *संतसाहित्य: आकलनआणि अध्यापन*, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ, पुणे.

१३.	संपा. सिन्नरकरमं.र.,(२०१८), *मराठी संतसाहित्य: अभ्यासदिशा*, शारदाप्रकाशन, ठाणे.

१४.	देखणेरा. अ.(२००२),*भारूड वाङमयातील तत्त्वज्ञान*, पद्मगंधाप्रकाशन, पुणे.

१५.	कुलकर्णी व. वि. (१९९१), मराठी प्रबंध सूची, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

आ. पाश्चात्य साहित्य संदर्भ:

1. *Schwartz, Shalom H. (2012). "An Overview of the Schwartz Theory of Basic Values". Online Readings in Psychology and Culture.* ***2*** *(1). doi:10.9707/2307-0919.1116.*

2. *Schwartz, Shalom H. (1992). "Universals in the Content and Structure of Values: Theoretical Advances and Empirical Tests in 20 Countries". Advances in Experimental Psychology: 1–65.*

3. *Bilsky, Wolfgang; Janik, Michael; Schwartz, Shalom H. (2010-07-20). "The Structural Organization of Human Values-Evidence from Three Rounds of the European Social Survey (ESS)". Journal of Cross-Cultural Psychology.* ***42*** *(5): 759–776. CiteSeerX 10.1.1.1013.6256. doi:10.1177/0022022110362757. ISSN 0022-0221..*

4. *Schwartz, Shalom H.; Sagiv, Lilach (1995-01-01). "Identifying Culture-Specifics in the Content and Structure of Values". Journal of Cross-Cultural Psychology.* ***26*** *(1): 92–116. doi:10.1177/0022022195261007. ISSN 0022-0221.*

5. *Struch, Naomi; Schwartz, Shalom H.; van der Kloot, Willem A. (2002-01-01). "Meanings of Basic Values for Women and Men: A Cross-Cultural Analysis". Personality and Social Psychology Bulletin.* ***28*** *(1): 16–28. doi:10.1177/0146167202281002. ISSN 0146-1672.*

6. *Coelho, Gabriel Lins de Holanda; Hanel, Paul H.P.; Johansen, Mark K.; Maio, Gregory R. (2018-08-30). "Mapping the Structure of Human Values through Conceptual Representations". European Journal of Personality. doi:10.1002/per.2170. ISSN 0890-2070.*

7. *Skimina, Ewa; Cieciuch, Jan (2015). "Value structure and priorities: Other-report account". Current Issues in Personality Psychology.* ***6*** *(3): 252–259. doi:10.5114/cipp.2018.72259. ISSN 2353-4192.*

8. *Fischer, Ronald; Schwartz, Shalom (2011). "Whence Differences in Value Priorities? : Individual, Cultural, or Artifactual Sources". Journal of Cross-Cultural Psychology.* ***42*** *(7): 1127–1145. doi:10.1177/0022022110381429.*

9. *Lindeman, Marjaana; Verkasalo, Markku (2005). "Measuring Values With the Short Schwartz's Value Survey". Journal of Personality Assessment.* ***85*** *(2): 170–178. doi:10.1207/s15327752jpa8502_09. PMID 16171417.*

10. *Morris, Jacob J. (October 2, 2018). Personal Values Assessment: Explore the 57 Values Fundamental to Human Motivation. Independently published. p. 8. ISBN 978-1791346959.*

संशोधिका, मार्गदर्शक,

डॉ. शारदानिवातेडॉ. माधव बसवंते

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याणचे, राजीव गांधी महाविद्यालय,

जनता विद्यामंदिर प्रशाला, दहिवली,मुदखेड, जि.नांदेड

ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

संपर्क: ९३२४५३२५६८ संपर्क: ९४०४९००३१८

e mail: shardaniwate@yaoo.com **e mail: madhavgbt@gmail.com**